# मातंग जातीचा सामाजिक आणि राजकीय अविष्कार

राहुल नरंगलकर,
सा. प्राध्यापक,राज्यशास्त्र ,
अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे.

महाराष्ट्रात अनुसुचित जाती संवर्गात ५९ जाती असून त्यातील महार (नवबौध्द), मातंग आणि चांभार या प्रमुख जाती होत. अनुसुचित जातींच्या एकूण लोकसंख्येपैकी या प्रमुख जातींची लोकसंख्या ८० ते ९० % दरम्यान असून त्यातही महार प्रथम, मातंग द्वितीय व चांभार तृतीय स्थानावर आहेत. अनुसुचित जाती संवर्गातील सर्व जाती पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जाती असून त्यांचे संपूर्ण जीवन शोषीत व वंचित स्वरुपाचे राहिलेले आहे. गावगाड्यातील संवर्ण जातींची सेवा चाकरी करणे आणि त्या बदल्यात संवर्ण जातीने दिलेल्या दयेच्या भिकेवर जगणे ही या जातींची पारंपारीक स्थिती आहे. त्यातही या प्रमुख जातींची परस्परांशी तुलना केली असता त्यातील मातंग जात ही आर्थिक साधन संपत्तीच्या बाबतीत महार आणि चांभारांपेक्षा अधिक परावलंबी आढळते. त्यामुळे मातंग जातीचा विकास प्रक्रियेतील शिरकाव महार, चांभारांनंतर उशीराने झालेला आहे.

ब्रिटीश राजवटीच्या काळात ब्रिटिशांनी सुरु केलेल्या शैक्षणिक सुधारणांचा आणि प्रशासकीय / लष्करी सेवेचा लाभ घेऊन आपली उन्नत्ती साधण्याची कल्पकता महार चांभारांप्रमाणे मातंग जातीला साधता आलेली नाही. मातंग जात प्रस्थापित व्यवस्थेच्या बाजूने राहून इंग्रजांच्या विरोधात शेवटपर्यंत लढत राहिली, त्यामुळे इंग्रजांनी मातंग जातीला गुन्हेगार जमात म्हणून घोषीत करून विकास प्रक्रियेतील फायद्यापासून वंचित ठेवले त्यामुळे मातंगाचा विकास होऊ शकला नाही किंवा देशभक्त म्हणून असलेले फायदे त्यांना मिळू शकलेले नाहीत. अनुसुचित जाती संवर्गात प्रमुख असलेल्या या जातींमधील महत्त्वाचा पारंपारिक फरक म्हणजे या जाती जरी संवर्ण जातींकडून केल्या जाणाऱ्या शोषणात्याचाराचे समान बळी असणाऱ्या जाती असल्या तरी त्या परस्पर संबंधात शोषणाची जातीय उतरंड जोपासणाऱ्या जाती आहेत. अस्पृश्यांतर्गत शोषणाच्या जातीय उतरंडीत चांभार स्वत:ला महारांपेक्षा श्रेष्ठ समजत आणि मांग आणि महारांशी अस्पृश्यता पाळत. महार, मातंगांना तुच्छ लेखत आणि मातंगांचा विटाळ मानत. तर मातंग महार आणि चांभारांचा द्वेश करीत. ही पारंपारीक अंतर्गत संघर्षाची भावना (स्थिती) स्वातंत्र्योत्तर कालखंडात नष्ट होऊ शकली नाही. आज या तिन्ही जातींतर्गत अस्पृश्यता पाळली जात नसली तरी अदृश्य स्वरुपात परस्परांचा द्वेश आणि परस्परांबद्दल अविश्वास, संशय मात्र अस्तित्वात असलेला आढळतो. या जातींमधील हा अविश्वास, संशय आणि परस्पर द्वेश कमी होण्याऐवजी आरक्षणाच्या संधी सवलतींचा लाभ घेण्याच्या स्पर्धेतून वाढतच चाललेला आहे. महार, मांग आणि चांभार य पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातींनी जोपासलेला पारंपारीक अंतर्विरोध लक्षात घेऊन समान शोषणाच्या प्रश्नावर या जातींची एकजू करण्याचे प्रयत्न फारसे झालेले नाहीत. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीत या तिन्ही जाती जशा एकत्र दिसल्या तशा त पुन्हा कधीच एकत्र आलेल्या नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व अस्पृश्य जातींच्या प्रश्नांची सामुहिकता लक्षात घेऊ अस्पृश्यांच्या उन्नत्ती विकासाची चळवळ विचार व कृती या दोन्ही बाजूंनी एकात्म बनविण्याचा अटोकाट प्रयत्न चालविला. प त्यांना यात व्यापक यश मिळू शकले नाही. डॉ. आंबेडकरांनी उभारलेल्या चळवळीत मातंग आणि चांभार जातीतील काही ज सहभागी झालेले असलेतरी मातंग आणि चांभारांचा व्यापक पाठिंबा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मिळू शकला नाही. हे जसे आहे तसेच जे मातंग आणि चांभार बाबसाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या चळवळीत सहभागी झाले त्यांचाही स्विकार आंबेड अनुयायांनी केलेला नाही हे ही तितकेच खरे आहे.

महार, मांग आणि चांभार या जातीतील दुसरा अत्यंत महत्त्वाचा फरक म्हणजे चांभार जातीकडे आत्मौनत्तीची जितकी आ साधने होती/आहेत तितकी महार व मांगांकडे नव्हती/नाहीत. महारांना इनामी जमीनी आणि ब्रिटिश कालावधीतील लष्करी से लाभ जसा मिळाला तसा मातंगांना लाभ घेता आला नाही. महार जात नेहमीच परिस्थितीनुरुप वर्तन करून स्वहित साध ठरली तशी भूमिका मातंगांना घेता आली नाही. मातंग जात नेहमीच प्रस्थापित जाती समुहासोबत रहाणारी ग्राहक भूमिकेऐवजी सेवकाच्या भूमिकेत वावरणारी असल्याने मातंग जातीची नेहमीच उपेक्षा झालेली आहे. आपले हितसंबंध सु

ठेवण्याच्या आणि संवर्धित करण्याच्या प्रक्रियेत प्रामाणिक सेवकापेक्षा आक्रमक ग्राहकाची भूमिका अधक फायदेशीर ठरते. याचे आत्मभान अजूनही मातंग जातीत येऊ शकले नाही. त्यामुळेच मातंग हे महार व चांभार जातीच्या तुलनेत अधिक मागासलेले, अविकसित व वंचित राहिलेले आहेत.

आंबेडकरोत्तर कालखंडात दलित संकल्पनेच्या अनुषंगाने उभी राहिलेली दलित चळवळ सर्व अस्पृश्य जातींना सामावून घेऊ शकलेली नाही. ती महार (नवबौध्द) जातीत केंद्रित झाल्याने आणि दलित जातींमधील पारंपारिक अंतर्विरोध कमी करण्याचे आणि समान शोषणाच्या आधारावर या जातींची एकजूट करण्याचे फारसे प्रयत्न झालेले नसल्याने मातंग, चांभार आणि इतर दलित जाती स्वअस्तित्व उभे करण्याच्या दृष्टीने स्वतंत्रपणे कार्यरत झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रज्ञावंती वारसा लाभलेल्या रिपब्लिकन पक्षाची वाटचाल एकजातीय गटातटाच्या दिशेने सुरु झाल्याने आणि त्यानंतरच्या कालखंडात आपला आक्रमक ठसा अल्पावधित उमटविणारी दलित पँथर देखील रिपब्लिकन पक्षाच्याच वाट्याने गेल्याने अनुसुचित जातींचा संघर्ष आरक्षणाच्या संधी सवलतीपुरता सीमीत झाला आहे. सर्व अनुसुचित जातींच्या दारिद्र्याचा व सामाजिक-आर्थिक विषमतेचा प्रश्न संविधानिक सवलतीच्या कुबड्यांनी कधीच सुटू शकणार नाही याचा विसर सर्व अनुसुचित जातींना पडला आहे. प्रशासनातील वरिष्ठ पदे आण राजकारणातील सत्तापदे यात आपल्याला जास्तीत जास्त वाटा मिळाल्याने आपली उन्नत्ती घडून येऊ शकते या भ्रमात सर्वच दलित जाती वावरत असल्याचे दिसतात. सर्व संविधानिक सोयी सवलती आपल्याच वाट्याला अधिकाधिक कशा येतील अशा पद्धतीने महार, मांग आणि चांभार या प्रमुख जातींमध्ये उदयाला आलेला मध्यम वर्ग आणि या जातींच्या पक्ष संघटना डावपेचांची आखणी करताना आढळतो आणि त्या अनुषंगाने परस्परांत सुप्त संघर्ष तेवत ठेवून सवर्ण जातींच्या सहकार्याने हे लाभ प्राप्त करण्याच्या प्रयत्नात कार्यरत असलेला दिसतो. त्यामुळे आजचा अनुसुचित जाती संवर्गातील जातींचा संघर्ष सवर्णांकडून केल्या जाणाऱ्या अन्याय व अत्याचाराच्या विरोधात कमी आणि अनुसुचित जाती संवर्गातील जातींतर्गत अधिक असा तिव्र होत चालला आहे. हा संघर्ष अनुसुचित जाती संवर्गासाठीचे संविधानिक लाभ जोपर्यंत न्याय पध्दतीने या जातींमध्ये वितरीत केल्या जात नाहीत किंवा आरक्षणाच्या धोरणात त्याचे लाभ गरजूंना मिळावेत या दृष्टीने सुधारणा केल्या जात नाहीत तोपर्यंत संपुष्टात येणे अशक्य आहे.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात आणि स्वात्र्योत्तर १९८० च्या दशकापर्यंत मातंग जात समुह काँग्रेस पक्षाचा प्रामाणिक सेवकाच्या भूमिकेत राहून आपली सामाजिक व राजकीय भूमिका अविष्कृत करीत होता. काँग्रेस सोबतचे मातंगांचे राजकारण ग्राहकाऐवजी प्रामाणिक व विश्वासू सेवकांचे राहिल्याने मातंगातील काही जणांना सत्तेचा निश्चितपणे लाभ मिळाला असला तरी या लाभप्राप्त मातंग नेतृत्त्वाला मातंगाचे प्रभावी जन संघटन आणि त्याआधारे जन आंदोलन उभे करता आले नाही किंवा या लाभाचे झिरपण सामान्य मातंगापर्यंत पोहोचविता आले नाही. त्यामुळेच १९८० नंतरच्या दशकात मातंग जात समुहात अण्णा भाऊ साठे, लहुजी साळवे आणि मातंग जातीच्या नावाने विविध संघटना कार्यरत झाल्या. या संघटनांमध्ये अण्णा भाऊ साठे फाऊंडेशन, दलित स्वयंसेवक संघ, मातंग एकता आंदोलन, अखिल भारतीय मातंग संघ, भारतीय मातंग युवक संघटना, महाराष्ट्र मातंग संघर्ष समिती, दलित युवक आंदोलन, लोकस्वराज्य आंदोलन आणि क्रांतीवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ इत्यादींचा उल्लेख करता येईल.

मातंग जातीच्या या संघटनांचा संघर्ष एका बाजूला जातीय विषमता आणि शोषणाविरुध्द लढताना संवर्ण जातींशी तर दुसऱ्या बाजूला संविधानिक सोयी सवलतीत न्याय वाटा मिळावा यासाठी अनुसुचित जातींमधील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वरचढ, जागृत व संघटीत जातींशी असा दुहेरी स्वरुपाचा आहे. प्रारंभीच्या काळात मातंग जातीच्या या संघटना आण्णा भाऊ साठे आणि लहुजी साळवे यांच्या जयंत्या व पुण्यतिथ्यांच्या कार्यक्रमाच्या अनुशंगाने मातंग जातीत स्वत्वाची आणि स्वअस्तित्त्वाची जाणीव निर्माण करण्याच्या प्रक्रीयेत कार्यरत राहून मातंग जातीतील अनिष्ट चालीरिती आणि तुच्छता दर्शक व्यवसाय नष्ट व्हावेत यासाठी प्रयत्नशील होत्या, शिवाय संवर्ण जातीतून होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडण्याच्या कार्यात सक्रीय होत्या. त्यानंतरच्या कालखंडात या संघटना मातंग जातीला शासनाच्या विविध योजनांमध्ये, प्रशासकीय सेवेत आणि राजकीय सत्ता पदांमध्ये न्याय वाटा मिळावा यासाठी कार्यरत झालेल्या आढळतात. मातंग जातीच्या या संघटनांकडून महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांमध्ये वाटा मिळावा, मातंगांसाठी स्वतंत्रपणे आर्थिक विकास महामंडळाची स्थपना केली

Copyright © 2020 Authors

...र्थी, अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने पुरस्कार दिले जावेत आणि अनुसुचित जाती संवर्गासाठी असलेल्या आरक्षणात स्वतंत्र आरक्षण मिळावे अशा मागण्या होत असलेल्या आढळतात

...नंतरच्या कालखंडात सेना भाजप युतीने दलितांमधील चांभार आणि मातंग आणि अन्य हिंदू दलित जातींना स्वतंत्र करून दलितांतर्गत संघर्षाचा राजकीय लाभ घेण्याचे डावपेच आखले आणि दलितांतर्गत स्पर्धेला तिव्र करून महाराष्ट्राच्या ...बौद्ध) राजकारणापुढे हिंदू दलितांचे आव्हान उभे करण्याचा प्रयत्न केला. हिंदू दलितांमधील चांभार आणि काही प्रमाणात ... सेना भाजप युतीच्या हिंदुत्त्ववादी राजकारणाकडे आकर्षित झाले. मातंग जातीचे या हिंदुत्ववादी राजकारणाकडे झालेले संक्रमण ...समधील सरंजामी व्यवस्थेकडून मातंग जातीला सेवक म्हणून वापरून घेण्याच्या प्रवृत्ती विरुध्दची प्रतिक्रिया होती. काँग्रेस ...मधील प्रस्थापित मातंग जातीचे नेतृत्त्व राजकीय महत्वाकांक्षा बाळगलेल्या नवोदित तरुण मातंग नेतृत्त्वाला काँग्रेसमध्ये ...काम करण्याची संधी देत नव्हते; ती संधी काँग्रेसचे सरंजामी जोखड न स्विकारता सेना भाजप युतीच्या रुपाने मिळाल्याने ...कीय महत्वाकांक्षा बाळगलेला मातंग जातीतील तरुण वर्ग सेना भाजप युतीकडे वळला. परिणामी मातंग जात समुदाय काही ...प्रमाणात सेना भाजपकडे आकर्षित झाला. सेना भाजपमध्ये मातंगांपेक्षा चांभारांना अधिक पोषक वातावरण दिसते. कारण ...प्रमाणे (नवबौध्द) जातीय अत्याचाराच्याविरोधात आक्रमकपणे उभे राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या मातंगांपेक्षा चांभार युतीला ...धिक सोयीचे वाटतात. मातंग जातीला सेना भाजप युतीमध्ये चांभार जातीच्या तिव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागत असल्याने ...च्या पटलावरील मातंग जातीचे राजकारण यशस्वी होऊ शकले नाही. २००९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत ...भाजप युतीमध्ये महार (नवबौध्द) जातीचा झालेला जोरकस शिरकाव आणि चांभारांशी करावी लागणारी तिव्र स्पर्धा यामुळे ...ग जातीच्या सेना भाजप युतीतील अस्तित्त्वासमोर प्रश्नचीन उभे करणारे ठरले आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ...ही अलिकडे महार व मांगांपेक्षा चांभार अधिक सोयीचे वाटू लागले आहेत.

...आरक्षणांतर्गत आरक्षणाच्या वर्गीकरणाची मागणी ही केवळ महाराष्ट्रातील मातंग जातीपुरती मर्यादित असलेली बाब नाही तर या ...मागणीने विविध घटक राज्यात अलिकडे जोर धरला आहे. संविधानिक आरक्षणाचा लाभ ज्या जातींना मिळालेला नाही, ज्या ते ...लाभ घेण्यासाठी अजूनही सक्षम नाहीत त्या जाती आरक्षणांतर्गत वर्गीकरणाची मागणी करीत आहेत. त्यांची मागणी न्याय असली ...तरी ती अनुसुचित जाती - जमाती संवर्गांतर्गत संघर्ष तिव्र करणारी ठरली आहे. संविधानिक आरक्षणाचे न्याय वितरण न होण्यास ...घटनेतील आरक्षणाची सदोष व्यवस्था कारणीभूत आहे. राज्यघटनेत अनेक अस्पृश्य जाती उपजातींना एकत्रित करून ...अनुसुचित जातीचा संवर्ग तयार करण्यात आला आणि या संवर्गातील जाती उपजातींना संविधानाने दिलेल्या सोयीसवलतींचा लाभ ...घेण्याची समान संधी उपलब्ध करून देण्यात आली; परंतू हे लाभ घेण्याच्या स्पर्धेत या संवर्गातील जे अतिदुर्बल व ऐतिहासिक ...दृष्ट्या मागासलेले आहेत ते सामाजिक व आर्थिक दृष्टया वरचढ व आक्रमक जातींसमोर स्पर्धक म्हणून टिकू शकल्या नाहीत ...म्हणून राज्यघटनेतील या तरतूदींमध्येच मुळात दोष असा आहे की, या तरतूदी समनता हे तत्त्व स्विकारताना समान संधी ...उपलब्ध करून देतात, परंतू दुर्बलांना लाभ प्राप्तीमधील हिस्सा (Out come) मात्र मिळवून देत नाहीत. म्हणून घटनाकारांनी फक्त ...अनुसुचित जाती जमाती संवर्गातील सर्व जाती जमातींना राज्यघटनेने दिलेल्या विशेष सोयी सवलतींमध्ये समान संधी उपलब्ध ...करून दिली तरी त्यातील लाभांचे वाटप मात्र समानतेने करण्याची तरतूद केली नाही. त्यामुळे मातंग व मातंगांसारख्या शेकडो ...जाती जमातींना आरक्षणाच्या न्याय लाभांपासून वंचित रहावे लागत आहे.

...मातंग जातीच्या या मागण्यांची दखल समाज आणि अभ्यासकांकडून आजपर्यंत गांभीर्याने घेतली गेली नसली तरी शासनाचा मात्र ...काही मागण्यांच्या बाबतीत प्रतिसाद मिळालेला दिसतो. सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रत्येक जातीला ३० ...टक्क्यांपेक्षा अधिक प्रवेश न देणे, मातंग व भंगी जातींसाठी विशेष ३ % जागा राखून ठेवणे आणि महात्मा फुले आर्थिक विकास ...महामंडळाचे विभाजन करून मातंगांसाठी स्वतंत्र लोकशाहीर आण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणे ...आणि मातंग समाजाच्या मागासलेपणाचा अभ्यास करून शिफारसी सुचविण्यासाठी क्रांतीवीर लहुजी साळवे अभ्यास आयोगाची ...स्थापना करणे या बाबी मातंग जातीच्या दृष्टीने उपलब्धी ठरल्या आहेत.

...क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या स्थापनेपासून आयोगाचा अहवाल शासनाला सादर होईपर्यंत आणि या ...अहवालाच्या अंमलबजावणीच्या निर्णयाच्या संदर्भात जे राजकारण व ज्या घडामोडी घडल्या किंवा मातंग जातीच्या नेते आणि

ISSN : 2249-6661
Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

संघटनांकडून व अनुसुचित जातीसंवर्गातील स्पर्धक जातींकडून जे राजकारण केले गेले ते मातंगांच्या न्याय मागणीच्या मार्गात अडथळे आणणारे, अनुसुचित जातीतंर्गत असलेल्या पारंपारिक अंतर्विरोधाला आणि संशयी वृत्तीला बळकटी देणारे ठरले आहे.

## संदर्भ ग्रंथसूची


१) बाबासाहेब गोखले - मातंग समाज आरक्षण गर्जना.

२) पुरोगामी सत्यशोधक -अंक २, ३, ४ एप्रील ते डिसेंबर १९८० व अंक १, २, जानेवरी ते जून १९८१.

३) संपादक, शरणकुमार लिंबाळे - दलित पँथर.

४) संपादक, रमेश पानशे - महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या दिशा.

५) आनंद तेलतुंबडे - साम्राज्यवाद विरोध आणि जातीविनाश.

६) भा. ल. भोळे -जात व महाराष्ट्रातील राजकारण.

७) य. दि. फडके - महात्मा फुले समग्र वाड्मय.

८) क्रिमीनल क्लासेस इन बॉम्बे प्रेसीडेन्सी - १९०८.

९) डॉ. हनुमंत मिसाळ - महाराष्ट्रातील दलितांचे अंतरंग - मातंग समाजाचे समाजशास्त्रीय विश्लेषण.

१०) शासन निर्णय - महाराष्ट्र शासन, समाजकल्याण विभाग - इउक/१०८२/९०३८५/(३८) दिनांक १६ मे १९८४.

११) सुहास पळशीकर - जात व महाराष्ट्रातील राजकारण.

१२) डॉ. भा. सी. खडसे - मांग जात : एक समाज शास्त्रीय अध्ययन.


□□□